गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 3990 दिनांक 27/2/18
जावक क्र. 1080 दिनांक 5/3/18

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 539 दि. 26/2/2018
जावक क्र. 1085 दि. 27/2/18

महाराष्ट्र शासन

सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर. जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर
(दुरध्वनी क्रमांक २५५४२१०/फॅक्स क्रमांक ०७१२-२५६१७१३)
Email : jdhengp@rediffmail.com

---

क्र.उशिनाग/गणित भौतीक खुली गुणवत्ता व इतर शिष्यवृत्ती/३०३६/२०१८ दिनांक २८/०२/२०१८

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. संचालक, शास./सर्व प्राचार्य अशासकीय अनु. महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती/ आर्थिक सहाय्य योजनांची ऑफ लाईन पद्धतीने कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र स्कॉलर-४९१७/प्र.क्र १४६/ मशि-२, दिनांक ०२/०८/२०१७
२. शासन निर्णय क्र संकीर्ण २०१७/प्र.क्र ३३२/ तांशि-४ दिनांक ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र संकीर्ण २०१७/प्र.क्र ४६५/ तांशि-४ दिनांक १४/०२/२०१८
४. मा. संचालक, उच्च शिक्षण यांचे परिपत्रक उशिसं/शिष्य-२०१७/ ऑफ लाईन कार्यवाही/१७७६, दिनांक १६/०२/२०१८

उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र.४चे अवलोकन करण्यात यावे व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. संदर्भीय क्र.३ वरिल दिनांक १४/२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण संचालनालया अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता महाडीबीटी प्रणालीतुन वगळुन त्यांची अंमलबजावणी पुर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालया अंतर्गत येणाऱ्या (१) राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (२) गणित व भौतिकशास्त्र शिष्यवृत्ती (३) शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती (४) माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य (५) स्वातंत्र सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य व इतर योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्याचे ऑफ लाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण सूचना :

१) ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी MahaDBT पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनीही ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
२) विद्यार्थ्यांनी ऑफ लाईन पद्धतीने शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाला दिनांक २८/०२/२०१८ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.
३) ऑफ लाईन अर्जाचे नमूने शासन निर्णय शिष्यवृत्तीबाबतची माहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.
४) शिष्यवृत्तीसाठी विहीत अटी व शर्तीचे अवलोकन करून आवश्यक कागदपत्रांची छायांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
५) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम आधार संलग्नित खातेवर थेट जमा करण्यात येत असल्याने बँक खाते व आधार क्रमांकाबाबतची माहिती अचूक भरावी. व बँकेच्या पासबूकची प्रथम पृष्टाची छायांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ यांचेसाठी सर्वसाधारण सूचना**

१) सन २०१७-१८ या वर्षासाठी शिष्यवृत्तीबाबत कार्यवाही करण्यासाठी कमी कालावधी असल्याने सदर शिष्यवृत्तीबाबत तात्काळ विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात.

२) शिष्यवृत्तीच्या नुतनीकरण अर्ज भरण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मंजूर करणे आवश्यक आहे. संदर्भीय परिपत्रकातील क्रमांक ७, ८ व ९ वरील शिष्यवृत्तीचे नुतनीकरणाचे अर्ज या कार्यालयास दिनांक ५/३/२०१८ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

३) उपरोक्त शिष्यवृत्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत प्राचार्य/संस्था प्रमुख / कुलसचिव यांची राहील.

४) महाविद्यालयांनी पडताळणी केल्यानंतर शिष्यवृत्तीला पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे दिनांक ५/३/२०१८ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

५) शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करणारे विद्यार्थी ऑफ लाईन शिष्यवृत्तीची माहिती न मिळाल्याने तसेच महाविद्यालयांनी मुदतीत अर्ज संचालनालयास/सहसंचालक कार्यालयास सादर न केल्याने वंचीत राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

सोबत शासनाचे परिपत्रक योजनेच्या अर्जाचा नमुना अटी व शर्ती यासोबत जोडण्यात येत आहे.

A. M. Rahatgaonkar

(डॉ. अंजली रहाटगावकर)
सहसंचालक,
उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

**प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांना माहितीस्तव**

